**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे निबंध स्पर्धेचे आयोजन

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे श्री चक्रधर स्वामी जयंतीच्या निमित्ताने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'आद्य समाजसुधारक श्री गोविंद प्रभू' हा निबंध स्पर्धेचा विषय ठेवण्यात आला असून अमरावती शहरातील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. निबंध विद्यार्थ्यांनी दि. २२ सप्टेंबर, २०१८ पर्यंत विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रात प्रत्यक्ष अथवा पोष्टाने पाठवावयाचे आहेत.

या निबंध स्पर्धेत उत्कृष्ट निबंध ठरलेल्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, ग्रंथ व प्रशस्तीपत्र देवून सन्माननीत करण्यात येईल. याशिवाय सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या निबंधस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले असून अधिक माहितीकरीता त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ८२७५४६९१६६ यावर संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०५/०९/२०१८ .

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी